आरोग्य सेवा संचालनालय,
( महाराष्ट्र राज्य )
' आरोग्य भवन ' सेंट जार्जेस रुग्णालय, आवार पी. डिमेला रोड, मुंबई - ४००००१

| कार्यालय | दूरध्वनी ०२२ | Website : http:// arogya.maharashtra.gov.in |
|---|---|---|
| संचालक | २२६२१०३१-३६ | Email : dhs_2005@rediffmail.com |
| सहसंचालक (अर्थव प्रशासन ) | २२६२११८६ | Email : miscell@rediffmail.com |
| मुख्य प्रशासकीय अधिकारी | २२६२१९७३ | Email : aodesk2adhs@gmail.com |
| प्रशासकीय अधिकारी | २२६२६२०४ | |
| | क्रसंआसे/मवैआसे/२अ/टे-३/ वै.अ. गट - पदभरती८७७/ 9639- /१९<br>दि. २५/०७/२०१९ | |


# सूचना

विषय- महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ संवर्गातील वैद्यकीय अधिकारी गट-अ ( पे बॅन्ड १५६००-३९१०० ग्रेड वे ५४०० सहाव्या वेतन आयोगानुसार ) मधील वैद्यकीय अधिका-यांच्या रिक्त असलेल्या एकुण ८७७ पदे भरतीबाबत.

शासन पत्र क्रमांक मवैअ-२०१९/ प्र.क्र.४०८/ सेवा-३, दिनांक १९ जुलै २०१९ व दि. २२ जुलै २०१९ अन्वये वैद्यकीय अधिकारी गट-अ यांच्या भरतीसाठी समुपदेशन प्रक्रिया आरोग्य भवन, आरोग्य सेवा संचालनालय, सेंट जॉर्जेस रुग्णालय, आवार, मुंबई - ४००००१ येथील तळमजल्यावरील सभागृहात दिनांक २३ जूलै २०१९ पासून सकाळी ०९ .०० वाजता पासून सुरु करण्यात आली आहे.

सदर प्रक्रियेतील गुणवत्ता यादी तयार करताना शासनाच्या उक्त पत्रातील निर्देशनानुसार राज्यातील रिक्त पदांच्या तुलनेत आवश्यक असणा-या पदव्युत्तर पदवी/ पदविका धारकांना प्राधान्याने बोलविण्यात येत आहे. त्यानुसार गुणवत्ता यादी क्रमांक १ मधील ७४९ उमेदवारांना प्राधान्याने पहिल्या व दुस-या दिवशी बोलविण्यात आले होते. गुणवत्ता यादी क्रमांक २ मधील उर्वरीत पदव्युत्तर पदवी/ पदविका धारक व एम.बी.बी.एस. अर्हताधारकांना त्यांच्या गुणवत्ता क्रमांकानुसार दिनांक २५/७/२०१९ पासून बोलविण्यात येत आहे.

गुणवत्ता यादी क्रमांक १ मधील (अ.क्र. १ ते ७४९ ) व गुणवत्ता यादी क्र.२ मधील गुणवत्ता क्रम (०१ ते ४०१ ) व (४०२ ते ८०१ ) पर्यंतच्या उमेदवारांची यादी आरोग्य सेवा संचालनालयाचे **Website : http:// arogya.maharashtra.gov.in** या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यापुढील गुणवत्ता क्रमांकानुसार उमेदवारांना दिनांक

Scanned by CamScanner

२९/७/२०१९ व दिनांक ३०/७/२०१९ रोजी समुपदेशनासाठी बोलावण्यांत येत आहे. समुपदेशनासाठी उमेदवारांनी स्वतः मुळ कागदपत्रांसह समक्ष उपस्थित राहणे आवश्यक आहे. तसेच जाहिरातीतील अटी व शर्ती आणि सदर संकेतस्थळावर प्रसिध्द झालेल्या सर्व सूचनांचे पालन करणे बंधनकारक आहे. सदर कालावधीतील गुणवत्ता क्रमांकाने समुपदेशनासाठी बोलावण्यांत येणा-या उमेदवारांच्या २ स्वतंत्र यादया आरोग्य सेवा संचालनालयाचे **Website : http:// arogya.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर या सूचनापत्रासोबत प्रसिध्द करण्यांत येत आहे.

## समुपदेशनाच्या कार्यक्रमाची रुपरेषा खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | दिनांक | समुपदेशनासाठी उपस्थित राहण्याचा क्रम | वेळ |
|---|---|---|---|
| १ | २९/०७/२०१९ | गुणवत्ता यादी क्रमांक २ मधील अ.क्र. ८०२ ते १४६१ | सकाळी ०९.०० वाजता |
| २ | ३०/०७/२०१९ | गुणवत्ता यादी क्रमांक २ मधील अ.क्र. १४६२ ते २१२८ | सकाळी ०९.०० वाजता |

(डॉ. अनुप कुमार यादव)
आयुक्त आरोग्य सेवा,
मुंबई

Scanned by CamScanner